
# ३) विनिच्छय महामत्त वत्थु

**प्रस्तावना**

प्राचीन काळात भारतामध्ये पंचायत व्यवस्था होती, ज्यामध्ये पंचायतीच्या सदस्यांना समाजामध्ये न्याय करणाऱ्या लोकाच्या रुपामध्ये आदरयुक्त सन्मान प्राप्त होत होता. गावातील वेगवेगळ्या प्रकारच्या समस्यांना सोडविण्याकरीता या व्यवस्थेची स्थापना झाली होती. स्वतंत्र भारतामध्ये भारताचे संविधान बनविताना सविधान निर्मात्यांनी सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, दुय्यम न्यायालये अशी न्याय व्यवस्थेची रचना केलेली आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून न्यायालयाला मौलिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी संबंधितांना निर्देश, आदेश देण्याचे अधिकार आहेत. न्यायव्यवस्था ही निपक्ष असल्यामुळे सर्वसामान्य व्यक्ती सुध्दा इथे न्यायाची अपेक्षा करीत असतो. न्यायव्यवस्थेच्या नि:पक्षपणावरच न्यायव्यवस्थेची विश्वसनीयता अवलंबून असते. 'विनिच्छय महामत्त वत्थु' न्यायव्यवस्थेशीच संबंधित आहे.

प्रस्तुत पाठ 'धम्मपद अट्ठकथा' मधील 'धम्मट्ठवग्गो' यातील आहे. यामध्ये तथागत बुद्धानी, भिक्खूंना न्यायाधिशाविषयी जो अनुभव आला होता, तो त्यांच्याकडून ऐकल्यानंतर तथागतांनी भिक्खुंना अधार्मिक आणि धार्मिक न्यायाधीश कुणाला म्हणतात, याविषयी उपदेश केला आहे.

**''विवक्षित प्रकरणी अटक, निश्चित कायदे व समान न्याय यांची अंमलबजावणी करणे''**



एकदिवसम्हि भिक्खू सावत्थियं उत्तरद्वारगामे पिण्डाय चरित्वा पिण्डपातपटिक्कन्ता नगरमज्झेन विहारं आगच्छन्ति। तस्मिं खणे मेघो उट्ठाय पावस्सि। ते सम्मुखागतं विनिच्छयसालं पविसित्वा विनिच्छयमहामत्ते लञ्जं व गहेत्वा सामिके असामिके करोन्ते दिस्वा ''अहो इमे अधम्मिका, मयं पन इमे धम्मेन विनिच्छय करोन्तीति सञ्ञिनो अहुम्हा'' ति चिन्तेत्वा वस्से विगते विहारं गन्त्वा सत्थारं वन्दित्वा एकमन्तं निसिन्ना तमत्थं आरोचेसुं।

सत्था ''न, भिक्खवे, छन्दादिवसिका हुत्वा साहसेन अत्थं विनिच्छिनन्ता धम्मट्ठा नाम होन्ति, अपराधं पन अनुविज्जित्वा अपराधानुरुपं असाहसेन विनिच्छयं करोन्ता एव धम्मट्ठा नाम होन्ती '' ति वत्वा इमा गाथा अभासि –

**''न तेन होति धम्मट्ठो, येनत्थं साहसा नये।**
**यो च अत्थं अनत्थञ्च,उभो निच्छेय्य पण्डितो।।**

**''असाहसेन धम्मेन, समेन नयती परे।**
**धम्मस्स गुत्तो मेधावी, धम्मट्ठोति पवुच्चती'' ति।।**

तत्थ तेनाति एत्तकेनेव कारणेन, धम्मट्ठोति राजा हि अत्तनो कातब्बे विनिच्छयधम्मे ठितोपि धम्मट्ठो नाम न होति। येनाति येन कारणेन। अत्थन्ति ओतिण्णं विनिच्छितब्बं अत्थं। साहसा नयेति छन्दादीसु पतिट्ठितो साहसेन मुसावादेन विनिच्छेय्य। यो हि १. छन्दे पतिट्ठाय ञातीति वा मित्तोति वा मुसा वत्वा असामिकमेव सामिकं करोति, २. दोसे पतिट्ठाय अत्तनो वेरीनं मुसा वत्वा सामिकमेव असामिकं करोति, ३. मोहे पतिट्ठाय लञ्चं गहेत्वा विनिच्छयकाले अञ्ञविहितो विय इतो चितो च ओलोकेन्तो मुसा वत्वा ''इमिना जितं, अयं पराजितो'' ति परं नीहरति, ४. भये पतिट्ठाय कस्सचिदेव इस्सरजातिकस्स पराजयं पापुणन्तस्सापि जयं आरोपेति, अयं साहसेन अत्थं नेति नाम। एसो धम्मट्ठो नाम न होतीति अत्थो। उभो निच्छेय्याति यो पन पण्डितो उभो अत्थानत्थे विनिच्छिनित्वा वदति। असाहसेनाति अमुसावादेन। धम्मेनाति विनिच्छयधम्मेन, न छन्दादिवसेन। समेनाति अपराधानुरूपेनेव परे नयति, जयं वा पराजयं वा पापेति। धम्मस्स गुत्तो ति सो धम्मगुत्तो धम्मरक्खितो धम्मोजपञ्ञाय समन्नागतो मेधावी विनिच्छयधम्मे ठितत्ता धम्मट्ठोति पवुच्चती ति अत्थो। देसनावसाने बहु सोतापत्ति मग्ग पलादिनी पापुणिंसु'ति।

**(संदर्भ– धम्मपद अट्ठकथा)**



## शब्दार्थ

**पिण्डाय (वि.)**– भिक्षाटनाकरिता
**चरित्वा (पूर्व.क्रि.)**– विचरण करून, फिरून
**पटिक्कन्तं (कृ.)**– परत आलेला
**नगरमज्झेन (नपु.)**– नगरामध्ये, नगरामधून
**आगच्छन्ति (क्रि.)**– येतात
**खणे (क्रि.वि.)**– क्षणात
**मेघ (पु.)**– ढग, बादल
**उट्ठाय (पूर्व.क्रि.)**– क्रियाशील
**पावस्सि(पु.)**– पाऊस, वर्षा
**विनिच्छयसाल (नपु.)**– न्यायालय, सरकारी कचेरी
**पविसित्वा (पूर्व.क्रि.)**– प्रवेश करून
**विनिच्छयमहामत्ते (पु.)**– न्यायाधीश
**लञ्चं (नपुं.)**– लाच
**गहेत्वा (पूर्व.क्रि.)**– घेऊन
**सामिक (पु.)**– स्वामी
**करोन्त (कृ.)**– करत असताना, करताना
**दिस्वा (पूर्व.क्रि.)**– पाहून
**अहु(प.म.पु.ए.व.)**– होणे
**चिन्तेत्वा (पूर्व.क्रि.)**– विचार करून
**वस्स (पु.)**– वर्षा, पाऊस
**विगत (भू.क्रि.)**– निघून गेला
**सत्था (पु.)**– शास्ता, मार्गदर्शक, बुद्ध
**आरोचेसु (भू.क्रि.)**– कथन केले
**छदन (नपु.)**– छत
**हुत्वा (पूर्व.क्रि.)**– होऊन
**साहसेन (नपु.)**– स्वैराचार, स्वैरवर्तन
**धम्मट्ठ (वि.)**– धर्मस्थित
**समेन**– अपराधानुरुप समानभावाने विचारांचा निर्णय करतो.
**अभासि(भू.क्रि.)**– म्हटले
**तेन (अव्यय)**– या कारणाने
**नये (पु.)**– योग्य परिणाम
**अत्थ (वि.)**– अर्थ, कल्याणकारक
**निच्छेय्य (पु.)**– निश्चय, निर्धार
**गुत्त (कृ.)**– संरक्षित
**पवुच्चति (वर्त.क्रि.)**– म्हणतो, सांगतो
**तत्थ (क्रि.वि.)**– तिथे, त्या ठिकाणी
**एत्तो (अव्यय)**– येथे, येथून
**कातब्ब (नपु.)**– कर्तव्य
**ठित (नपु.)**– ठिकाण
**ओतिण्ण (कृ.)**– अवतरित, येत असता
**पतिट्ठितो (वि.)**– प्रतिष्ठित
**अत्तनो (पु.)**– स्वतः, आपोआप
**वेरी (वि.)**– वैरी, शत्रू
**अञ्ञ (पु.)**– सन्माननीय व्यक्ती, वेगळा
**विहितो (कृ.)**– योग्य, उचित
**विय (पु.)**– समान, सारखा
**ओलोकेति (वर्त.क्रि.)**– अवलोकन करतो, पाहतो
**नीहरति (वर्त.क्रि.)**– बाहेर येऊन जातो
**परं (वि.)**– दुसरा
**इस्सर (पु.)**– स्वामी, प्रमुख, महान
**जाति (स्त्री.)**– जन्म
**पापुणन्तं (कृ.)**– पोहोचता, गाठता
**आरोपेति (वर्त.क्रि.)**– दोष देतो, आरोप करतो
**नेति (वर्त.क्रि.)**– नेतो, घेऊन जातो
**एसो (सर्व.ना.)**– हा
**भूत (कृ.)**– होऊन गेलेला
**विनिच्छिनित्वा (पूर्व.क्रि.)**– निर्णय लावून
**पापेति (वर्त.क्रि.)**– पोहोचवितो, मिळवितो
**समन्नागत(वि.)**– युक्त
**ठितत्त(नपु.)**– स्थितत्व, संयत

# स्वाध्याय

**१.खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'विनिच्छय महामत्त' याचा अर्थ सांगा.

२) 'विनिच्छय महामत्त वत्थु' ही धम्मदेसना तथागतांनी कुठे दिली?

३) 'अधार्मिक' म्हणजे काय?

४) 'धार्मिक' म्हणजे काय?

५) 'धार्मिक न्यायाधीश' कुणाला म्हटले जाते?

६) तथागत बुध्दांनी भिक्खुंना कशाविषयी उपदेश दिला?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) 'न तेन होति धम्मट्ठो, येनत्थं साहसा नये।'

२) 'अधम्मस्स गुत्तो मेधावी, धम्मट्ठोति, पवुच्चती' ति।

३) 'साहसा नयेति छन्दादीसु पतिट्ठितो साहसेन मुसावादेन विनिच्छेय्य।'

४) असाहसेन धम्मेन समेन नयती परे।

५) साहसेनाति मुसावादेन, धम्मेनाति विनिच्छयधम्मेन, नछन्दादिवसन।

**३.योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

१) एकदिवसम्हि भिक्खू सावत्थियं उत्तरद्वारगामे पिण्डाय ............ पिण्डपातपटिक्कन्ता।
(चरित्वा/ कातुं)

२) ''अहो इमे............, मयं पन 'इमे धम्मेन विनिच्छयं करोन्ती ति।''
(अधम्मिका/धम्मिका)

३) अपराधं पन............अपराधानुरुपं असाहसेन विनिच्छयं करोन्ता।
(विज्जित्वा/अनुविज्जित्वा)

४) मोहे पतिट्ठाय लञ्चं गहेत्वा विनिच्छयकाले ............विय इतो चितो।
(अञ्ञविहितो/विहितो)

५) अयं............अत्थं नेति नाम।
(असाहसेन/साहसेन)

**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) न तेन होति धम्मट्ठो | अ) उभो निच्छेय्य पण्डितो। |
| २) असाहसेन धम्मेन | ब) येनत्थं साहसा नये। |
| ३) यो च अत्थं अनत्थञ्च | क) धम्मट्ठोति पवुच्चती' ति। |
| | ड) समेन नयती परे। |

**५. सूचनेनुसार कृती करा.**


१) विहारं आगच्छन्ति। (काळ ओळखा)

२) 'दिस' (पूर्वकालवाचक अव्यय करा.)

३) 'विनिच्छयसालं' (माध्यम भाषेमध्ये अर्थ लिहा)

४) 'धम्मिक न्यायाधिस'(पालिभाषेमध्ये लिहा)

**६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) विनिच्छय महामत्त (न्यायाधीश) यावर स्वमत प्रकट करा.

२) 'विनिच्छय महामत्त वत्थु' या पाठाच्या आधारे धम्मिक आणि अधम्मिक निर्णय याविषयी लिहा.

☆☆☆